प्रथम मुद्रणवाद

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**
**मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहिल्यानगर – ४२३१०९**
**फोन नं. कार्यालय – ०२४२३-२५८८६१**
**ई-मेल- saibabaiti22@gmail.com, saibaba_iti@yahoo.co.in**
**वेबसाईट – www.saibabasansthan.org.in, www.sai.org.in**

**विषय – श्री साईबाबा औ.प्र. संस्थेचे टर्नर व मशिनिस्ट ग्राईंडर ट्रेड मधील खालील तपशिलाप्रमाणे मशिन रिकंन्डिशनिंग (दुरुस्ती) करणेकामीचे दरपत्रक देणेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये कळविण्याचे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस खालील नमुद केलेप्रमाणे मुळ उत्पादक कंपणीचे स्पेअरपार्टसह दुरुस्ती खर्चाची निम्नतम दरपत्र अनुभवी एजन्सीकडुन दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक सर्व्हिस एजन्सीज यांनी खाालील अटी – शर्तीस अधीन राहुन विहीत वेळेत सिलबंद दरपत्र पाठवावे.

| व्यवसायाचे नाव | अ.नं. | मशिन तपशिल | मशिन दुरूस्ती तपशिल | मशिन संख्या |
|---|---|---|---|---|
| टर्नर | १ | हायड्रोलिक पावर हॅकसौ मशिन (जसवंत मेक) | १. हायड्रोलिक पॉवर पॅक सिस्टिम बदली करणे.<br>२. कुलंट टॅंक पंप दुरुस्त करुन कार्यान्वित करणे.<br>३. बेअरींग बेल्ट व पुली बदलणे, पॅकींग बदलणे.<br>४. क्लॅपींग व्हॉईस रिपेअर करणे.<br>५. ईले. मोटारचे बेअरींग व रिव्हर्स – फॉरवर्ड स्विच बदलणे.<br>६. संपूर्ण मशिनचे रंगकाम करणे. | ०१ |
| | २ | किर्लोस्कर टर्न मास्टर ३५/४० लेथ मशिन | १. स्पिंडल गिअर बॉक्स<br>२. फिड गिअर बॉक्स<br>३. क्रॉस स्लाईड अॅप्रान गिअर बॉक्स खोलुन स्वच्छ करणे व पुन्हा फिटींग करणे.<br>४. स्पिंडल गिअर बॉक्सचे गिअर बेअरींग व शाफ्ट तपासणे आवश्यक वाटल्यास दुरुस्त अथवा बदली करणे.<br>५. अप्रॅान गिअर बॉक्स तपासुन आवश्यकता वाटल्यास गिअर शिफ्टर गिअर व शाफ्ट बुश बदलणे.<br>६. लॉग बेड लिड-स्क्रु व बॉक्स नटची दिशा बदलणे.<br>७. क्रॉस लिड स्क्रु व बॉक्स नट बदलणे.<br>८. फिड गिअर बॉक्सचे बेअरींग बुश व गिअर बदलणे.<br>९. टेल स्टॉकचे लिड स्क्रु व बॉक्स नट बदलणे. | ०५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | १०. टेल स्टॉक व स्पिंडलची अलायमेंट तपासणे व दुरुस्त करणे.<br>११. स्पिंडल बदलणे, कुलंट मोटार बेअरींग बदलणे.<br>१२. रिव्हर्स – फॉरवर्ड स्विच, लिमिट स्विच, नॉन कॉन्टक्टर रिले, स्विच, वायरींग ई. बदलणे.<br>१३. सर्व मशिनची फिटिंग अलायमेंट तपासुन जॉब ट्रायल देणे तसेच त्यानंतर संपूर्ण मशिनचे रंगकाम करणे. | |
| मशिनिस्ट ग्राईडर | ०३ | किर्लोस्कर १३३० लेथ मशिन | १. संपूर्ण क्रॉस स्लाइड स्क्रॅपिंग, ग्राईडींग व ब्लु मॅचिंग करणे.<br>२. टेल स्टॉक स्पिंडल व हेड स्टॉक स्पिंडल यांची अलायमेंट करणे.<br>३. हेडस्टॉक शिफ्टरचा मेन्टेनन्स करणे.<br>४. फिड गिअर बॉक्स अलायमेंट करणे व नट हाफ बदलणे.<br>५. लॉग बेड ग्राईडिंग व स्क्रपिंग करणे.<br>६. फोर जॉ व थ्रि जॉ चेक रिपेअरींग करणे.<br>७. कुलंट सिस्टिम व ईलेक्ट्रिक मेन्टेनन्स करणे.<br>८. संपूर्ण मशिनचे रंगकाम करणे. | ०१ |
| | ०४ | सिलेंड्रीकल ग्राईडींग मशिन | १. टेल स्टॉक दुरुस्त करणे.<br>२. वर्क हेड बेअरींग बदलणे.<br>३. संपूर्ण मशिनचे रंगकाम करणे. | ०२ |
| | | | एकूण मशिन संख्या | ०९ |

## अटी व शर्ती

१. मशिन दुरुस्ती कामाची पाहणी दि. २३/०९/२०२५ ते ३०/०९/२०२५ अखेर शनिवार, रविवार व शासकीय सुट्टी सोडुन कार्यालयीन वेळेत (स. १० ते संध्या. ०६) श्री साईबाबा औ.प्र.संस्था, शिर्डी येथे करता येईल. तसेच याबाबत कोणतेही व्हिजीट चार्जेस अथवा प्रवास भाडे संस्थानकडे मागता येणार नाही.

२. श्री साईबाबा संस्थान ही एक धर्मादाय संस्था असल्याने दरपत्रकात जास्तीत जास्त सवलत देण्यात यावी.

३. सर्व्हिस, लेबर चार्जेस, स्पेअर पार्ट यांचे एकत्रित दरपत्रक द्यावयाचे आहे.

४. दुरुस्तीबाबत संस्थानकडुन कुठल्याही प्रकारची आगाऊ रक्कम (अॅडव्हान्स) दिली जाणार नाही.

५. मशिनचे स्पेअरपार्ट दुरुस्ती झालेनंतर मशिनची यशस्वी ट्रायल ट्रेड निदेशक / गटनिदेशक व सहाय्यक अभियंता यांचे समोर देणे बंधनकारक राहील.

६. कार्यपुर्ती नंतर १५ दिवसांत RTGS द्वारे पेमेंट अदा केले जाईल.

७. पॅन नं. , बँक अकाउंट डिटेल्स, GST नंबर दरपत्रकात नमुद करावा. GST नंबर नसल्यास तसे नमुद करावे.

८. मशिन दुरुस्तीकामी लागणारे आवश्यक टुल्स, स्पेअर पार्ट, कुशल मनुष्यबळ संबंधित एजन्सीने आणावयाचे आहे.

९. मशिन दुरुस्ती करताना काही अपघात झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

पान नं. ०३व२

१०. आपले दरपत्रक बंद पाकिटात दि. ३०/०९/२०२५ रोजी सायं. ०५:०० वाजेपर्यंत मा. मुख्यकार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नावाने **"औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी मशिन रिकंन्डीशनिंग (दुरुस्ती) करणेकामी दरपत्रक"** असा पाकिटावर स्पष्ट उल्लेख करुन संस्थानचे आवक विभागाकडे जमा करावे.

**११.** समक्ष मशिनची पहाणी करुनच दुरुस्तीचा तपशिल जाणुन घेवुन दरपत्रक द्यावेत. नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. तसेच मंजुर दरातच कार्यपूर्ती करावी लागेल, वाढीव बिलाची मागणी करता येणार नाही.

१२. विहीत मुदतीत प्राप्त न होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१३. शासकीय नियमानुसार करकपात बिलातुन केली जाईल.

१४. कार्यादेश प्राप्त झालेनंतर ९० दिवासाचे आत कार्यादेशात नमुद सर्व मशिनचे कामे पुर्ण करावे लागेल.

१५. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे कुठलेही एक अथवा सर्व कोटेशन कुठल्याही कारणाशिवाय नाकारणे अथवा स्विकारणेबाबतचा हक्क राखुन ठेवत आहे.

१६. सदर व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१७. फर्मची नोंदणी प्रमाणपत्र, उद्योग आधार प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती दरपत्रकासोबत जोडाव्यात.

कळावे.

23/9/25

**(विश्वनाथ बजाज)**
**प्र. प्रशासकीय अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**